# नोटीस ऑफ फायलींग

# Filing of Notice

डिपॉझिट ऑफ टायटल डीड पध्दतीच्या कर्जव्यवहारांची माहिती दुय्यम निबंधक कार्यालयाच्या अभिलेखावर यावी, त्याद्वारे संबंधित पक्षकाराचे हित संरक्षित व्हावे तसेच त्या मिळकतीचा व्यवहार करण्यापूर्वी त्या मिळकतीसंदर्भात झालेल्या कर्जव्यवहारांची माहिती इतरांनाही व्हावी या उददेशाने नोंदणी अधिनियम,1908 मध्ये दि. 01/04/2013 पासून पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात आल्या आहे.

---

1. डिपॉझिट ऑफ टायटल डीड पध्दतीने होणा-या कर्जव्यवहारांसाठी जर बँक/वित्तीय संस्था आणि कर्ज घेणार यांचेदरम्यान Agreement किंवा अशा कोणत्याही नावाचा करारनामा निष्पादित करण्यात आला तर तो करार दुय्यम निबंधक कार्यालयात नोंदणी करणे अनिवार्य (Compulsory) करण्यांत आले आहे. त्यासाठी कलम 17 मध्ये सुधारणा करण्यांत आली आहे.

---

2. मात्र जर अशा कर्जव्यवहारामध्ये उभय पक्षांमध्ये असा कोणताही करारनामा निष्पादित करण्यात आलेला नसेल तर त्या कर्ज प्रकरणातील कर्ज घेणा-याने उक्त कर्जव्यवहाराबाबची माहिती नमूद असलेली नोटीस दुय्यम निबंधक कार्यालयात फायलिंगसाठी सादर केली पाहिजे, अशी तरतूद नोंदणी अधिनियम,1908 चे कलम 89 ब मध्ये करण्यात आली आहे.

यासंदर्भात अधिक माहीतीसाठी पहा याच संकेतस्थळावरील सारथी>FAQ>दस्त नोंदणी> इक्वीटेबल मार्गेज संदर्भातील नोटीस ऑफ इंटिमेशन फायलींग.

---